Address:- Office Of The Commissioner Of Police ,
Premlok Park Chinchwad,
Maharashtra - 411033

## प्रेसनोट दिनांक – २३/०५/२०२४

**दि. २२/०५/२०२४ रोजी रात्रौ ००.०० वा ते २४.०० वा पर्यत दाखल गुन्हे**

**भाग १ ते ५ चे गुन्हे**

०१.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | सांगवी २१७/२०२४, भा.द.वि.कलम ३०७,३४१, ३२४,३२३, ५०४,४२७,३४, आर्म ॲक्ट ४ (२५)(२७), महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ३७(१)(३)/ १३५ प्रमाणे |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि २२/०५/२०२४ रोजी रात्रौ.००.१५ वा.चे सुमारास महादेव मंदिराजवळील स्पीड ब्रेकरजवळ पिंपळे निलख पुणे |
| गुन्हा दाखल | :- | दि २२/०५/२०२४ रोजी १९/१७ वा |
| फिर्यादी | :- | कृष्णाकुमार उपेन्द्र पासवान वय. २१ वर्षे धंदा नोकरी रा. के/ऑ. शाम राजपुत, स्वप्नसाई बिल्डींग, विनायकनगर पिंपळे निलख पुणे |
| आरोपी | :- | १) शुभम मानमोडे रा. पिंपळे निलख, पुणे. २) संकेत थोरात, रा.वाकड, पुणे ३) व त्यांचा एक अनोळखी मित्र |
| तपशिल | :- | नमुद ता वेळी व ठिकाणी यातील आरोपी १ ते ३ यांनी संगनमत करुन मागील दिड महिन्यापुर्वी आरोपी १ याने फिर्यादी यांचा भाऊ नामे सचिन पासवान यास तंबाखु मागितले असता त्याने तंबाखु दिली नाही या कारणावरुन त्यांचेत वाद झाला होता त्याकारणावरुन चिडुन, मनात राग धरुन आरोपी १ याने फिर्यादी यास “ साले तेरे को जान से मारता हुं ” ? असे बोलुन शिवीगाळ करुन लाथा बुक्क्यांनी, दगडाने मारहाण केली तसेच आरोपी १ याचा दुसरा साथीदार आरोपी २ याने “तेरे को खल्लास करता हुं ” असे बोलुन त्याचेकडील कोयत्याने फिर्यादी यांचे डोक्यावर व हातावर वार करुन जीवे ठार मारण्याचा प्रयत्न केला तसेच त्या तिघांनी मिळुन फिर्यादी यांची यामाहा कंपनीची मोटार सायकल नं. एम.एच.१४/ एल.एच./८०१६ याची तोडफोड करुन नुकसान केले म्हणुन |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | सपोनि पाटील ९१३७२७३४५० |

०२.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | चिंचवड २१६/२०२४ भा.दं. वि. कलम– ३०४(२), ३४ प्रमाणे |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि.२१/०५/२०२४ रोजी १३/०० वा. जलशुध्दीकरण केंद्राच्या समोर, पत्राशेड झोपडपट्टी, लिंक रोड, चिंचवड, पुणे |
| गुन्हा दाखल | :- | दि.२२/०५/२०२४ रोजी१७.४९ वा |
| फिर्यादी | :- | दिलीप नामदेवकसबे, वय-५५ वर्षे, धंदा-पेंटर, रा. पत्राशेड झोपडपट्टी, चिंचवड, पुणे |
| आरोपी | :- | १ )मिथुन उर्फ भारत मधुकर सिरसाट वय ३८ रा. पत्राशेड झोपडपट्टी, चिंचवड, पुणे<br>२)अतिश भारत सिरसाट, दोघे रा. पत्राशेड झोपडपट्टी, चिंचवड, पुणे<br>आरोपी क्र. १ अटक आहे |
| तपशिल | :- | नमुद ता वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी यांचा मुलगा,व आरोपी व इतर इसम थांबले असताना फिर्यादी यांचे मुलाने आरोपी १ याचेकडे सिगारेट पिण्यासाठी मागितले त्यावेळी आरोपी १ याने सिगारेट देण्यास नकार दिला म्हणुन फिर्यादी यांचे मुलाने आरोपी १ याचे डोक्यात एक सहज चापट मारली त्याकारणाचा त्याला अचानकपणे राग आल्याने त्या रागाने आरोपी १ व २ यांनी फिर्यादी यांचे मुलाचे छातीवर हाताने व लाथाबुक्यांनी जोरजोरात मारत होते. त्यांचे मारहाणीमध्ये फिर्यादी यांचे मुलाचा मृत्यु होण्याचा संभव आहे हे माहित असुन सुध्दात्यास पुन्हा-पुन्हा मारत होते. त्यांनी केलेल्या मारहाणीमुळेच फिर्यादी यांचा मुलगा राजकुमार कसबे वय २८ वर्षे हा मयत झालेला आहे म्हणुन |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | पोउपनि व्हरकाटे ९९२११३७६४७ |

०३.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | महाळुंगे एमआयडीसी ३१५/२०२४ भा.द.वि.कलम२७९,३०४ (अ) |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि.२२/०५/२०२४ रोजी १७.३० वा. चे. सुमारास मौजे पाईटगावचे हद्दीत सोमनाथ मंगल कार्यालयाजवळ ओम श्रीराम एच. पी गॅस एजन्सीचे गोडाऊनचे समोर |
| गुन्हा दाखल | :- | दि.२२/०५/२०२४ रोजी २१/२० वा |
| फिर्यादी | :- | प्रविन श्रीराम घोलप वय ६२ वर्षे धंदा शेती व गॅसएजन्सी रा. पाषाण मंत्री अव्हेन्यु सोसायटी पंचवटी पुणे |
| आरोपी | :- | आकाश महादेव लष्करे वय ३२ वर्षे रा. चिंबळी बर्गे वस्तीता. खेड जि. पुणे |
| तपशिल | :- | नमुद तारीख वेळी व ठिकाणी गॅस एजन्सीचे गोडाऊनचे समोर ट्रक नं केए- २६ ए- २२७३ वरील चालक नमुद आरोपी याने त्याचे ताब्यातील ट्रक गॅस गोडाऊनचे दरवाज्या जवळ रिव्हर्स घेत असताना हयीगयीने बेदरकारपणे चालवून फिर्यादीचे गॅस एजन्सीचा कामगार सुखराम भियाराम खिलेरिया वय ३८ वर्षे मुळ रा. मगरानगर हनिया ता. बावरी जि. जोधपुर राज्य राजस्थान यास ट्रकचे पाठीमागील बाजु व लोखंडी दरवाजा याचे मध्ये चेंबवून गंभीर जखमी होणेस व त्याचे मृत्यूस कारणीभूत झाला आहे म्हणून |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | पोउपनि जाधव ९७६६०३७६२३ |

०४.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | रावेत २४२ /२०२४ भा.द.वि.स.कलम ४२०,४०६ माहीती तंत्रज्ञान अधिनियम २००० कलम ६६ (ड) |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि ०६/०४/२०२४ रोजी ११:०० वा ते दि ०७/०५/२०२४ रोजी १९:०० वा पर्यंत फिर्यादी यांचे राहते घरात ऑनलाईन माध्यमातुन. |
| गुन्हा दाखल | :- | दि २२/०५/२०२४ रोजी १७:१५ वा |
| फिर्यादी | :- | पुरुष फिर्यादी वय- ३७ वर्षे, व्यवसाय- नोकरी, रा- पुनावळे ता- हवेली, जिल्हा पुणे. |
| आरोपी | :- | अनोळखी मोबाईल नंबर अ६२८५७१३२४१७७८ धारक सिध्दार्थ सुकुमार पुर्ण नाव पत्ता माहित नाही. |
| तपशिल | :- | नमुद ता.वेळी व ठिकाणी यातील आरोपी याने फिर्यादी यांचे मोबाईलचे व्हॉटसअपवर त्यांना ईनोवेटीव स्टॉक मार्केट या नावाच्या ग्रुपमध्ये अॅड करुन त्यांचे मोबाईलमध्ये शेअरखान मॅक्स नावाचे अॅप इन्स्टॉल करण्यास सांगुन सदर अफपमध्ये गुंतवणुक केल्यास दोन महिण्यात ५०० ऽ परतावा मिळुन देण्याचे आश्वासन देवुन फिर्यादीस वेगवेगळ्या बँकअकाऊंटवर पैसे पाठविण्यास सांगुन फिर्यादींची एकुण ८,७४,०००/- रु ची आर्थीक फसवणुक केली |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | मपोहवा मेहता |

०५.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | वाकड ६४५/२०२४ भा.दं.वि. सहिता कलम ४२०,३४ माहिती तंत्रज्ञान अधिनियम कलम ६६ (ड) प्रमाणे |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि १९/०२/२०२४ रोजी ०९/३४ वा. ते दि २४/०४/२०२४ रोजी पर्यंत फ्लॅट नं. ५१०, ए विंग, रोहित पिंनॅक्ले, बापुजी बुवा गार्डन जवळ, थेरगाव पुणे |
| गुन्हा दाखल | :- | दि २२/०५/२०२४ रोजी १९.०३ वा |
| फिर्यादी | :- | पुरुष फिर्यादी वय- ३७ वर्ष, धंदा- नोकरी, रा. बापुजी बुवा गार्डन जवळ, थेरगाव पुणे. |
| आरोपी | :- | १)रवी तोमर वय २८ वर्षे अंदाजे (मो.नं. ८८५३७१९०२३, ८८५३६७३५८५, ७२०८२७७९५४, ८९५३८११७२५, ८१२७७०३५६८)<br>२) करनवीर ढिल्लोन वय २६ वर्षे अंदाजे (मो.नं. ८८५३३३०७६५),<br>३) अभिजीत ठाकुर वय २७ वर्षे अंदाजे (मो.नं. ९९४५६४७११५),<br>४) निलमा चौहान वय २८ वर्षे अंदाजे (मो.नं. ९०७६५७३५५४) पुर्ण नाव पत्ता माहीत नाही. |
| तपशिल | :- | नमुद ता वेळी व ठिकाणी यातील आरोपी यांनी फेसबुक वर स्टॉक एक्सप्लोर नावाची जहिरात दाखवुन त्यावर व्हॉट्सअॅप ग्रुपची लिंक टाकुन त्याव्दारे व्हॉटसअॅप ग्रुप जॉईन करायला लावुन सदर ग्रुप मध्ये शेअर मार्केट, स्टॉक, आयपीओ मध्ये मोठ्या प्रमाणात नफा होत असल्याचे भासवुन लिंक व्दारे Alice.SES नावाचे अॅप डाऊनलोड करायला भाग पाडुन जास्तीचा नफा भेटण्याचे आमिष दाखवुन वेगवेगळ्या बँक खात्यावर पैशांची गुंतवणुक करण्यास सांगुन त्या बँक खात्याव्दारे पैसे Alice.SES App मध्ये जमा झाल्याचे व त्याव्दारे ट्रेडिंग सुरु असल्याचे व मला मोठ्या प्रमाणात नफा होत असल्याचे भासवुन इलेट्रोनिक साधना व्दारे ऑनलाईन पद्धतीने नमुद आरोपी क्र. १ ते ४ यानी फिर्यादी यांना मोठ्या प्रमाणावर नफा मिळवण्याचे आमिष दाखवुन वेगवेगळ्या बँक खात्यावर एकुन २२,१५,०००/- रु. भरण्यास सांगुन फिर्यादी यांची आर्थिक फसवणुक केली आहे |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | पोनि विठठल साळुंखे ७७५८९२१२१४ |

०६

पोस्टे व गु रजि.नं. :- पिंपरी ४७२/२०२४ भादंवि कलम ३३६,महानगरपालिका अधिनियम १९९५ चे कलम २४४ व २४५,महाराष्ट्र मालमतेच्या विरुपणास प्रतिबंध करण्याकरीता अधिनियम १९९५ कलम ३ प्रमाणे

गु.घ.ता.वेळ व ठि. :- दि.१५/०५/२०२४ पासुन ते दिनांक २०/५/२०२४ रोजी पर्यत प्रति दिवशी सकाळी ०९/४५ ते सायंकाळी ०६/१५ वा दरम्यान पिंपरी महानगरपलिकेच्या
हद्दीमध्ये स.नं.१०९/११०,आण्णासाहेब मगर स्टेडियम समोर नेहरु नगर पिंपरी पुणे व इतर ठिकाणी

गुन्हा दाखल :- दि. २२/०५/२०२४ रोजी १०/०९ वा

फिर्यादी :- राजेंद्र दुर्गाचरण चौधरी वय ५१ वर्षे,धंदा- नोकरी (आकाश चिन्ह व परवाना विभाग पिंपरी चिंचवड महानगर पालिका) रा .श्रीगणेश कॉलनी,सर्व्हे नं.१३३,आकुर्डी रेल्वे स्टेशन जवळ,वाल्हेकरवाडी चिंचवड पुणे

आरोपी :- १)मे.वाघेरे प्रमोटर्स २)जे के बिल्डर्स ३)व्ही अपटाऊन ४)सुखवानी अरतुज ५)मे.यशोधन पब्लिसिटी ६)मे.शुभांगी अडव्हरटायझिंग ७)शिवशंकर अॅडव्हरटायझिंग (आतिश ढवळे ) ८)जे के बिल्डर्स ९)म्हाडा स्किम १०)हॉटेल कामत ११)आनंद पब्लिसिटी १२)आनंद पब्लिसिटी १३)आनंद पब्लिसिटी १४)निनावी १५)मे.शुभांगी अडव्हरटायझिंग १६)बालाजी फर्निचर १७)मे.धनंजय विठ्ठल काळभोर १८)स्पाईन सिटी १९)झरेकर २०)कॅस्टल गेट २१)प्रताप बारणे २२)गणेश एंटरप्रायझेस (अभिजित लखणे) २३)हर्षवर्धन भोईर **आरोपी अटक नाही**

तपशिल :- वर नमुद ता.वेळी व ठिकाणी यातील आरोपी जाहिरात धारक,जागा मालक,होर्डिंग बनविणारे इसम यांनी सार्वजनिक रोड लगत खाजगी जागेमध्ये लोखंडी स्ट्रक्चरवर होर्डीग लावुन सदर ठिकाणी जाहिरात प्रदर्शित करुन मानवी जिवीत किंवा इतरांची व्यक्तिगत सुरक्षितता धोक्यात येईल इतक्या बेदरकारपणे,हयगयीने कृती करुन पिंपरी चिंचवड महानगर पालिकेच्या हददीमध्ये जाहिरात व्यवसाय करताना,जाहिरात फलक उभारताना महानगरपालिकेतुन पुर्व परवानगी घेणे आवश्यक असताना त्याचे उल्लंघन केले म्हणुन

त.अधिकारी/अंमलदार :- पोउपनि माने ९६८९७६८३२२

०७

पोस्टे व गु रजि.नं. :- वाकड ६५२/२०२४ भादंवि कलम ३२६, ३२३, ५०४, ५०६, १४३, १४५, १४७, १४८, १४९, भारतीय हत्यार कायदा कलम ४(२५), क्रिमीनल लॉ अॅमेंडमेंट कायदा कलम ३ व ७, महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ३७(३) सह १३५ प्रमाणे

गु.घ.ता.वेळ व ठि. :- दि.२२/०५/२०२४ रोजी रात्री ००.३० वा चे सुमा. ईडन चौक, वाकड पुणे. येथील सार्वजणिक रस्त्यावर

गुन्हा दाखल :- दि.२२/०५ /२०२४ रोजी २३ /५३ वा

फिर्यादी :- अभिषेक चंद्रशेखर रोखडे, वय ३२ वर्षे, धंदा- व्यवसाय, रा. सर्वे नं. ७४/१, समर्थ नगर, महालक्ष्मी मंदिर समोर, नवी सांगवी, पुणे.

आरोपी :- आठ अनोळखी इसम

तपशिल :- नमुद तारीख वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी व फिर्यादीचा मित्र नामे सनी प्रदिप कलाटे, वय-३४ वर्षे, असे आम्ही दोघेजन फिर्यादीचे स्विफट गाडीने गाडी क्रमांक एम एच १२ जीएम ११७२ ने सखाराम वाघमारे चौक येथून रोडने ईडन चौकाचे दिशेने जात असताना, आमच्या पाठिमागे एक लाल रंगाची चार चाकी स्विफट गाडी जोरजोरात हॉर्न वाजवत आमच्या गाडीचे पाठिमागे येऊन ईडन चौक येथे त्यातील सुरूवातीस अनोळखी चार इसमानी आम्हास आंगावर धावत येऊन शिवीगाळ व हाताने मारहान करून आमचा मित्र अक्षय कलाटे हा आमचे भांडण सोडवण्यास मध्ये पडला असताना, आम्हा सर्वाना तुम्हाला माहित आहे का आम्ही कोण आहेत आम्ही कोथरूडचे भाई आहोत अशी धमकी देवुन लोखंडी कोयता व पालघन घेवुन फिर्यादीला व मित्र सनी कलाटे यास साधी दुखापत व मित्र अक्षय कलाटे यास गंभिर रित्या वार करून जखमी करून त्यांनी त्यांचे हातातील कोयता व पालघन हवेत फिरवुन, आरडाओरडा करुन, परिसरात दहशत निर्माण करुन तेथुन त्यांचे जवळील लाल रंगाच्या चार चाकी स्विफट गाडीने व दोन दुचाकी मोटरसायकलने तेथून पळुन गेले.म्हणुन

त.अधिकारी/अंमलदार :- पोउपनि जाधव ७५०७४५५२९४

०८

पोस्टे व गु रजि.नं. :- पिंपरी ४७३/२०२४ भा.द.वि.कलम ३२४, ३२३, ५०४, ५०६, ३४ प्रमाणे

गु.घ.ता.वेळ व ठि. :- दि.२०/०५/२०२४ रोजी रात्रौ ११/३० वाजताचे सुमारास साई-लीला हौसिंग सोसायटी, बिल्डींग नं.- ६, फ्लॅट नं.- १११, विठ्ठलनगर नेहरुनगर पिंपरी पुणे.

| | | |
|---|---|---|
| गुन्हा दाखल | :- | दि.२२/०५/२०२४ रोजी१८/१० वा |
| फिर्यादी | :- | संतोष भिमा विधाते वय २९ वर्षे, रा.- साई-लीला हौसिंग सोसायटी, विठ्ठलनगर नेहरुनगर पिंपरी पुणे. |
| आरोपी | :- | १)सुनिल शिवाजी जाधव, वय २८ वर्षे अंदाजे, रा. बिल्डींग नं. ५, विठ्ठलनगर नेहरुनगर पिंपरी पुणे, २) अनिल शिवाजी जाधव, वय २६ वर्षे अंदाजे, रा. बिल्डींग नं. ५, विठ्ठलनगर नेहरुनगर पिंपरी पुणे, ३) शिवाजी जाधव, वय ५० वर्षे अंदाजे, रा. बिल्डींग नं. ५, विठ्ठलनगर नेहरुनगर पिंपरी पुणे ४) दिप जावळे , वय ३० वर्षे अंदाजे, रा. विठ्ठलनगर नेहरुनगर पिंपरी पुणे<br>**आरोपी अटक नाही** |
| तपशिल | :- | वर नमुद तारीख व ठिकाणी फिर्यादी हयाचे मेहुणीच्या लग्नाची पार्टी न दिल्याचे कारणांवरुन राग मनात ठेवुन दिनांक २०/०५/२०२४ रोजी रात्रौ ११/३० वा. फिर्यादी हे आले असता यातील आरोपी १ ते ४ यांनी संगणमत करुन फिर्यादी यांचे दोन्ही पायावर लोखंडी रॉडने मारुन जखमी केले तसेच फिर्यादी यांचे पाठीत व हातावर लाकडी बॅट व दांडक्याने मारुन जखमी करुन शिवीगाळ केली म्हणुन |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | पोउपनि उबाळे ९७६२७३४४०७ |

०९.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | रावेत २४३/२०२४ भा.द.वि.स कलम ४२०,३४ प्रमाणे |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि.१४/०५/२०२४ रोजी १०/०० वा ते दिनांक २१/०५/२०२४ रोजी १४/०० वा पर्यंत तुळजाभवानी रसवंतीगृह रावेत व भोसरी ब्रिज खाली, भोसरी |
| गुन्हा दाखल | :- | दि. २२/०५/२०२४ रोजी २२.४७ वा. |
| फिर्यादी | :- | बाबासाहेब सिताराम पौळ वय ४२ वर्षे धंदा ड्रायव्हर रा आदर्शनगर, मालवाली नगर . किवळे |
| आरोपी | :- | १)राजु (पुर्णनाव व पत्ता माहीत नाही) २)इतर तीन अनोळखी इसम आरोपी अटक नाही |
| तपशिल | :- | नमुद तारीख वेळी व ठिकाणी यातील अनोळखी इसमांनी दोन दुचाकी गाडीवर फिर्यादीचे तुळजाभवानी रसवंतीगृह, समीर लॉन समोर आले व दोघांनी फिर्यादी सोबत ओळख केली व त्यानंतर दुसऱ्या दिवशी देखील फिर्यादीचे ऊसाच्या रसाचे तुळजाभवानी रसवंतीगृह या ठिकाणी येवुन राजु (पुर्णनाव माहीत नाही) याने व त्याच्या सोबतच्या एका अनोळखी इसमाने फिर्यादी सोबत चांगली ओळख करुन घेतली तसेच फिर्यादीला पिवळया रंगाची मण्याची माळ दाखवुनती सोन्याची असल्याचे सांगितले व सदरची माळ त्यांना मातीत सापडली असल्याचे सांगितले. त्यावर विश्वास ठेवुन फिर्यादीने स्वताकडे ०१ लाख रुपये असल्याचे सांगुन तेवढे सोने विकत घेण्याकरीता तयार झालो असता सदर इसमांनी फिर्यादीला सोने खरेदी करीता दिनांक २१/०५/२०२४ रोजी भोसरी ब्रिज खाली, बोलावुन फिर्यादीकडुन ०१ लाख रुपये घेतले व फिर्यादीला सोन्याची असल्याचे सांगुन एक पिवळया मण्यांची माळ दिली व निघुन गेले. सदर मण्याच्या माळे बाबत फिर्यादीला संशय आल्याने ती फिर्यादीने सोनाराकडे चेक केली असता खोटी असल्याचे समजल्याने फिर्यादीने त्यांना त्यांच्या मोबाईलवर वारंवार फोन केला असता सदर इसमांचा फोन लागला नाही त्यामुळे फिर्यादीची फसवणुक झाली आहे म्हणुन |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | सपोनि कुंभार |

१०.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | देहुरोड २७७/२०२४ भादवि.क. ४२०,३४ प्रमाणे |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि.१५/०५/२०२४ रोजी ०८/४० वाचे सुमारास घोराडेश्वराच्या पायथ्याशी आडबाजुला झाडाचे आड जुना पुणे मुंबई हायवेलगत शेलारवाडी ता. मावळ जि. पुणे |
| गुन्हा दाखल | :- | दि.२२/०५/२०२४ रोजी १८/१६ वा |
| फिर्यादी | :- | श्री.आकाश दिपक पाटील वय २६ वरषे धंदा-व्यवसाय रा. मुपो. भुकुम मल्टीस्पेशालिटी क्लिनिक, निअर भुकुम बसस्टॉप चिलापी हॉटेलच्या बाजुला भुकुम ता. मुळशी जि. पुणे |
| आरोपी | :- | राजु, विशाल व इतर १ अनोळखी इसमांनी पुर्ण नाव पत्ता माहीत नाही **आरोपी अटक नाही** |
| तपशिल | :- | नमुद तारीख वेळी व ठिकाणी यातील नमुद आरोपी व इतर ०१ अनोळखी इसमांनी पुर्ण नाव पत्ता माहीत नाही यांनी फिर्यादीचा विश्वास संपादन करून मला सोन्याचे दोन पॅन्ड दाखवुन ते खरे असल्याची खाजी पटल्यानंतर पुन्हा उर्वरीत ११०० पॅन्डल खोटे व पितळी मुलामा केलेले सोने फिर्यादीला व फिर्यादीचे वडीलांना वरील ठिकाणी देवुन आमची ०३ लाख रुपयांची आर्थीक फसवणुक केलेली आहे. म्हणुन |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | सपोनि जाधव ८१०८८५६५६५ |

११

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | वाकड ६४३/२०२४ भा.दं.वि. कलम ३३६ प्रमाणे |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि १३/०२/२०२४ रोजी २२/३० वा. ते दि १४/०२/२०२४ रोजी १०/१५ वा. सुमारास मौजे थेरगाव स.नं. १७/१/२८ पै, सि.सनं. ४०३९ पै |
| गुन्हा दाखल | :- | दि. २२/०५/२०२४ रोजी १५.५९ वा |
| फिर्यादी | :- | सुनिल नारायण अहिरे, वय- ५३ वर्ष, धंदा- नोकरी, रा. फ्लॅट नं. क्यु २०२, शितल बाग, भोसरी पुणे. (उपअभियंता महानगरपालिका पिंपरी चिंचवड) |
| आरोपी | :- | सुनिल दिलीप डोलवानी रा. स.नं. २१८, सफायर फ्लॅट नं. ए-६०५, पार्की स्ट्रिट वाकड पुणे आरोपी अटक नाही |
| तपशिल | :- | नमुद ता वेळी व ठिकाणी यातील जागा मालक सुनिल दिलीप डोलवानी रा. स.नं. २१८, सफायर फ्लॅट नं. ए-६०५, पार्की स्ट्रिट वाकड पुणे यांनी त्याच्या मालकीची इमारत २४ मी. डिपी रोड चे बाजुला धोकादायक पध्दतीने मानवी जीवित/ इतरांची व्यक्तिगत सुरक्षितता धोक्यात येईल अश्या रितीने झुकलेली/ बांधलेली दिसुन आल्याने ती मनपाकडील अग्निशामक विभाग, आपत्ती व्यवस्थापन विभाग, बांधकाम परवानगी विभाग व अनधिकृत बांधकाम निर्मुलन विभागाकडील अधिकारी/ कर्मचारी, ग क्षेत्रीय स्थापत्य आणि अतिक्रमण विभाग असे मिळुन सदर धोकादायक आढळुन आलेली इमारत निष्काशीत करण्यात आली. म्हणुन आरोपी यांच्या मालकीची इमारत २४ मी. डिपी रोड चे बाजुला धोकादायक पध्दतीने मानवी जीवित/ इतरांची व्यक्तिगत सुरक्षितता धोक्यात येईल अश्या रितीने झुकलेली/ बांधलेली दिसुन आल्याने म्हणुन गुन्हा |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | पोउपनि माने ८१०८८८८३५२ |

१२

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | हिंजवडी ६६६/२०२४ भा.दं.वि कलम २८५,२८६ सह जिवनावश्यक वस्तुचा कायदा १९५५ चे कलम ३,७ सह स्फोटक पदार्थ अधिनियम सन १९०८ चे कलम ५ प्रमाणे |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि.२२/०५/२०२४ रोजी १३/३० वा. चे सुमारास सिध्दनाथ गॅस एजन्सी चे पाठिमागील मोकळया जागेत, बानधन बु, ता मुळशी जि.पुणे |
| गुन्हा दाखल | :- | दि.२२/०५/२०२४ रोजी २२/१२ वा |
| फिर्यादी | :- | प्रदिप विठ्ठलराव गुट्टे पो. अंम २७१३ नेमणुक - खंडणी विरोधी पथक, गुन्हेशाखा, पिंपरी चिंचवड |
| आरोपी | :- | दादासाहेब अर्जुन श्रीनामे वय ३१ वर्ष, रा. राजेंद्र भुंडे यांचे बिल्डींगमधील प्लॅट नं १, बावधन ग्रामपंचायत ऑफिस समोर, बावधन बु पुणे ता मुळशी जि पुणे **आरोपी अटक नाही** |
| तपशिल | :- | नमुद तारीख वेळी व ठिकाणी यातील नमुद आरोपी याने बेकायदेशीरपणे घरगुती वापराचे व अत्यावश्यक सेवेतील गॅस सिलेंडर खरेदी करून जिवनावश्यक वस्तू असलेल्या घरगुती वापराचा गॅस विनापरवाना मोठया सिलेंडर टाक्यातून काढून छोटया ४ किलो वजनाच्या लोखंडी सिलेंडर टाक्यामध्ये गॅस रिफिलिंग नोजलचे साहाय्याने धोकादायक रित्या, कोणतेही सुरक्षेची काळजी न घेता, लोकांच्या जीवीतास धोका निर्माण होईल हे माहीत असून सुध्दा मानवी जिवीतास हानी पोहचविणा-या कोणत्याही संभाव्य धोक्यापासून सुरक्षित राहण्यास पुरेसा इतका बंदोबस्त करणे गरजेचे असताना अतिशिघ्र ज्वालाग्राही पदार्थ असल्याचे माहीती असूनही त्याबाबत पुरेसा बंदोबस्त करणेस जाणीवपूर्वक टाळून, लोकांचे जिवीतास धोका निर्माण होईल अशी कृती करून गॅस ट्रान्सफर करुन त्या गॅसच्या भरलेल्या टाक्या चढे दरात स्वतःचे आर्थिक फायदयाकरता, विनापरवाना, अवैधरित्या गॅस टाक्या व गॅस ट्रान्सफर करण्यास लागणारे साहीत्य असा एकूण ७२५००/- रु. किंमतीचा अवैध गॅस साठा व साहीत्य विक्री करण्याचे उद्देशाने जवळ बाळगले असताना मिळून आले आहेत. म्हणून |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | सपोनि जाधव ८६८९९३११६६ |